# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ / फाल्गुन २१, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

### राज्यातील संगणक परिचालकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(१) * ७०७२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील “आपले सरकार” सेवा केंद्रातील ग्रामीण भागात संगणक परिचालक गेल्या बारा वर्षापासून तुटपुंज्या पगारावर काम करित असून संगणक परिचालकाचे पगार वाढीचे आश्वासन देण्यात येऊनही अद्याप पगार वाढीची रक्कम परिचालकाच्या खात्यात जमा झाली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ग्रामीण भागात सर्वत्र ऑनलाईन सेवा सुरू झाली असतानाही ग्रामपंचायत स्तरावर या सेवा चालू करण्यासाठी मानधन तत्वावर नियुक्ती केलेल्या संगणक परिचालकांना वेळेत आणि पुरेसे मानधन देण्यात येत नसल्याने त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संगणक परिचालकांना वाढीव मानधन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) या विभागाच्या शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ अन्वये राज्यात “आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत ग्रामीण नागरिकांना विविध शासकीय, व्यावसायिक व बँकिंग सेवा एकाच केंद्रावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामपंचायतीतील आपले सरकार सेवा केंद्रामध्ये ग्रामोद्योजकांद्वारे सदर सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

• आपले सरकार सेवा केंद्र हा प्रकल्प माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये सुरू झाल्यावर केंद्रचालक / ग्रामोद्योजक यांना प्रतिमाह रुपये ६,०००/- इतके मानधन देण्यात येत होते.

• त्यानंतर फेब्रुवारी, २०२१ मध्ये केंद्रचालक/ ग्रामोद्योजक यांच्या मानधनात रुपये १०००/- इतकी वाढ करण्यात आल्याने त्यांना प्रतिमाह रुपये ७०००/- इतके मानधन अदा करण्यात येत होते.

• आता जुलै, २०२४ पासून केंद्रचालक/ ग्रामोद्योजक यांच्या मानधनात रुपये ३०००/- इतकी वाढ करण्यात आली असून त्यांना रुपये १०,०००/- इतके मानधन अदा करण्यात येते.

• तसेच ग्रामीण जनतेला इतर व्यवसायिक सेवा दिल्यामुळे केंद्रचालक/ ग्रामोद्योजक यांना रुपये १०,०००/- इतक्या मासिक मानधनाव्यतिरिक्त सदर सेवांचा अतिरिक्त मोबदला प्राप्त होतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला येथील रुग्णांकरीता औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) * ६८४१ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला येथे दररोज २ ते ३ हजार रुग्णांवर उपचार केले जातात मात्र रुग्णालयात औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांना औषधे उपलब्ध होत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषधांच्या तुटवड्यामुळे येथील गरीब रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदी करावी लागत असल्याने खाजगी मेडीकलमध्ये औषधांकरीता अवाजवी दर आकारले जात असल्याने गरिब रुग्णांचे आर्थिक शोषण होत असून, सर्व प्रकारची औषधे ओपीडी रुग्णांकरीता आणि दाखल होणाऱ्या रुग्णांकरीता उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी निवेदनाद्वारे केली असल्याचे तसेच याबाबत रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी वैद्यकीय विभागास पत्राद्वारे अवगत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला येथे रुग्णांकरीता औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) नाही.

(२) अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली आहे. तथापि, सदर तक्रार वस्तुस्थितीला धरुन नाही.

(३) सन २०२३ पासून संचालनालयाच्या अखत्यारितील रुग्णालयांना औषधे व तदनुषंगिक बाबींचा पुरवठा महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. तसेच संस्थास्तरावर राज्य निधी, संस्थेचे स्वयंप्रपंजी खाते तसेच जिल्हा नियोजन व विकास परिषदेकडून प्राप्त निधीच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर औषधांची खरेदी करण्यात येते. याशिवाय महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत पात्र रुग्णांना सदर योजनेतून रुग्णोपचार व औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पात्र घरकुल लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३)** * **६७९६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील गरीबांना हक्काचे घर देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना अस्तित्वात असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांपैकी ४३८५ लाभार्थ्यांना स्वत:ची जागा उपलब्ध नसल्याने त्यांना घरकुलाचा लाभ मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात ४३८५ लाभार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेतून अनुदान मंजूर आहे, परंतु स्वत:ची जागा नसणाऱ्या कुटुंबाना शासनाकडून जागा उपलब्ध करुन देण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भुमिहीन लाभार्थ्यांना मंजूर असलेले घरकुलाचे बांधकाम करणेसाठी तात्काळ शासकीय जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रचलित शासन निर्णयांनुसार विविध प्रकारे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ७,८१७ भुमिहीन लाभार्थीना जागा उपलब्ध करुन दिली आहे. उर्वरीत ४३८५ भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याची प्रक्रीया जिल्हा स्तरावरुन सुरू आहे. निधीची तरतुद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामाच्या रकमेत वाढ करून प्रलंबित घरकुलांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(४)** * **७२९० श्री.एकनाथराव खडसे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण या योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी शासनाकडून १ लाख २० हजार इतके अनुदान देण्यांत येत असून शासनाने दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी ५० हजार इतके वाढीव अनुदान देण्याचा निर्णय घेतला असला तरी लाभार्थ्यांना सदर वाढीव रक्कम अद्याप मिळाली नसल्याचे तसेच माहे ऑक्टोबर, २०२५ पासून लाभार्थ्यांना त्यापुढील निधीचा हप्ता उपलब्ध झाला नसल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील १ लाख ३२ हजार घरकुल लाभार्थ्यांना घरकुल योजनेतर्गत निधी मिळालेला नसल्याने सदरचे लाभार्थी लाभापासून वंचित असल्याची बाब दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून शासनाने रुपये ५० हजार इतक्या वाढीव अनुदानाचा निर्णय घेतला असला तरी इतक्या तुंटपुंज्या खर्चात घरकुल बांधणे शक्य नसल्याने शासनाने मोफत रेती देण्याबाबतची मागणी लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संसदीय समितीच्या स्थायी समितीने सदर योजनेचे अनुदान वाढविण्याबाबात केलेली शिफारस व लाभार्थ्यांची घरकूल योजना अंमलात आणण्याबाबत तसेच वाढीव अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २६९ चौ. फुट घरकुल बांधकामाकरीता रुपये १.२० लक्ष देण्यात येते.

शासन निर्णय दिनांक ०४/०४/२०२५ अन्वये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत राज्य हिश्श्यातून रुपये ५०,०००/- इतकी अतिरिक्त वाढ करण्याचा निर्णय घेतला.

या रुपये ५०,०००/- रकमेमधुन रुपये ३५,०००/- हे घरकुल बांधकामासाठी तर, रुपये १५,०००/- हे सौर ऊर्जा संच स्थापित केल्यानंतर देण्यात येईल.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल बांधकामाची रक्कम ही लाभार्थ्यांनी केलेल्या बांधकामाच्या टप्प्यानुसार लाभार्थ्यांच्या खात्यात थेट वितरित करण्यात येते.

जळगाव जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत १,१९,३८७ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, ६३,३१४ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, ३८,६६७ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता, ९,०२७ लाभार्थ्यांना चौथा हप्ता वितरित करण्यात आला आहे.

जळगाव जिल्ह्यात राज्याच्या वाळू निर्गती धोरण अनुसार १४,५५८ लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

संसदीय समितीच्या स्थायी समितीच्या शिफारशीवर कार्यवाही केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाटातील महिलांना जननी सुरक्षा योजना व जननी शिशू योजनेंतर्गत १०२ रग्णवाहिकांची सेवा सुरु करण्याबाबत

**(५) * ७६९८ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटातील महिलांना तातडीची मदत मिळवून देणारी महत्वाची सुविधा म्हणून अमरावती जिल्ह्यात जननी सुरक्षा योजना आणि जननी शिशू योजनेंतर्गत १०२ रुग्णवाहिकांची सुरु केलेली सेवा बंद झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत १०२ रुग्णवाहिका ह्या बंद असल्यामुळे रुग्णांना सदर रुग्णवाहिकांचा उपयोग होत नसून त्यांना रुग्णालयात स्वखर्चाने जाणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने मेळघाटातील गरोदर आणि स्तनदा माता तसेच लहान बालके रुग्णालयात जाऊ शकत नाहीत व त्यामुळे त्यांना उपचारापासून वंचित राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर १०२ रुग्णवाहिका तात्काळ सुरु करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मेळघाट मधील महिला व बालकांना तातडीने मदत मिळून देणारी महत्वाची सुविधा म्हणून जिल्ह्यात जननी शिशु सुरक्षा योजनेंतर्गत मेळघाटमध्ये १०२ च्या ६६ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. त्यापैकी चिखलदरा तालुक्यामध्ये ३१ रुग्णवाहिका (७ रुग्णवाहिका ग्रामीण रुग्णालय व २४ रुग्णवाहिका प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे) मध्ये कार्यरत आहेत. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत गर्भवती मातांना व बालकांना तपासणीकरीता व सोनोग्राफीकरीता व प्रसूतीकरीता व प्रसुती झाल्यावर घरी सोडून देण्याकरीता रुग्णवाहिका उपलब्ध असून कार्यरत आहेत. माहे डिसेंबर मध्ये चिखलदरा तालुक्यामध्ये एकूण १०१४ माता व बालकांना सेवा देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत १०२ रुग्णवाहिकांकरीता निधी उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सार्वजनिक व खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्णांसाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करुन स्वतंत्र टोल फ्री क्रमांक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) * ६६६२ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र रुग्ण हक्क नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्टमधील सुधारित नियम २०२१ नुसार रुग्णालयांनी रुग्णांसाठी वैद्यकीय सेवेचे दर प्रदर्शित करण्यासह रुग्णसेवेसंदर्भात तक्रारी नोंदविण्याकरीता टोल फ्री क्रमांकासह स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष सुरू करणे बंधनकारक करण्यात आले असतानाही मुंबईसह राज्याच्या खाजगी तसेच सार्वजनिक रुग्णालयांमध्ये रुग्णांसाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना तसेच तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले नसल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि मुंबईसह राज्यातील खाजगी तसेच सार्वजनिक रुग्णालयांमध्ये रुग्णांसाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्याबाबत तसेच तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच याबाबत दिरंगाई करणाऱ्या रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यात २९ आसनांचे आरोग्य सल्ला संपर्क केंद्र (टोल फ्री क्र. १०४) सन २०११-१२ पासून उरो रुग्णालय, पुणे येथे कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत आरोग्य कर्मचारी व अधिकारी (जसे आशा, एएनएम, वैद्यकीय अधिकारी व इतर आरोग्य कर्मचारी) यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य कार्यक्रमांविषयी तसेच सेवा देताना काही अडचण असल्यास वैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्याची आवश्यकता भासते. त्यावेळी आरोग्य सल्ला संपर्क केंद्र (टोल फ्री क्र. १०४) येथे संपर्क करुन वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेतात.

तसेच स्थानिक पातळीवर वैद्यकीय सेवा व सुविधांबाबत काही तक्रारी असल्यास त्याची नोंद होऊन तक्रार निवारण करुन रुग्णाभिमुख सेवा प्रदान करणे शक्य होते. आरोग्य सल्ल्यासाठी कॉल करणाऱ्याच्या विनंतीप्रमाणे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत माहिती देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रोहणा व इंदुर्का गावांमधील (जि.भंडारा) शेतकऱ्यांच्या जमिनींचा बेकायदेशीर लिलाव केल्याबाबत

**(७) * ६६३१ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहणा व इंदुर्का गावांमधील (जि.भंडारा) शेतकऱ्यांच्या सुमारे ४५५ हेक्टर जमिनी ऊर्जा प्रकल्पासाठी ताब्यात घेण्यात आल्या असून प्रत्यक्षात प्रकल्प सुरू न करता त्या जमिनी तारण ठेवून बँकांकडून कर्ज घेण्यात आले व कर्जफेड न झाल्याने संबंधित जमिनींचा बेकायदेशीर लिलाव करण्यात आल्याच्या तक्रारी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी जमीन संपादित करताना पुनर्वसन, पर्यावरण मंजुरी व आवश्यक परवाने न घेता केवळ कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी संबंधित कंपनी, बँका व शासकीय अधिकाऱ्यांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच भंडारा जिल्ह्यातील संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत मिळण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई व्हावी आणि भविष्यात अशाप्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

रोहणा व इंदुर्का (जि.भंडारा) या गावांतील शेतकऱ्यांची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारे संपादित केलेली नाही.

(२), (३) व (४) महसूल व वन विभागाने मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ कलम ६३ (१) (अ) सुधारणे अंतर्गत निर्गमित केलेल्या दिनांक ०१/०१/२०१६ च्या अधिसूचनेतील कलम २ मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे :

“परंतु तसेच, जर हस्तांतरितीने, तसेच नंतरच्या कोणत्याही हस्तांतरितीने, त्या जमिनीचा पाच वर्षांच्या कालावधीच्या आत, किंवा जेथे बिगर-उपयोजन आकार भरण्यात आला असेल तेथे, एकूण दहा वर्षांच्या कालावधीच्या आत प्रारुप किंवा अंतिम विकास योजना किंवा प्रादेशिक योजना किंवा यथास्थिती, नगररचना परियोजना यांमध्ये अनुज्ञेय असलेला अकृषिक वापर करण्यात कसूर केली असेल तर जिल्हाधिकारी, उक्त कसूरदार हस्तांतरितीला एका महिन्याची नोटीस दिल्यानंतर अशी जमीन परत घेईल आणि जिल्हाधिकाऱ्याने अशाप्रकारे परत घेतलेली जमीन, सर्व भारांपासून मुक्त होऊन, शासनाकडे निहित होईल; आणि मूळ जमीनधारकाने जी जमीन अशा अकृषिक वापरासाठी हस्तांतरित करण्यापूर्वी ज्या

भूधारणापध्दतीने प्रारंभी धारण केली होती त्याच भूधारणापध्दतीने आणि अशा मूळ जमीनधारकाने अशा अकृषिक वापरासाठी जी जमीन जितक्या किमतीला हस्तांतरित केली होती, तितक्याच किमतीला मूळ जमीनधारकाला देऊ करण्यात येईल.

मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ (सुधारणा १९९४) कलम ६३ (१)(अ) दिनांक २८/०४/१९९४ रोजी महसूल विभागाने निर्गमित केलेल्या अधिनियमानुसार, "खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ" शेतजमीन खरेदी करताना घटकाने थेट विकास आयुक्त (उद्योग) यांच्याकडे केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने याविषयी सुनावणी घेऊन केवळ खरेदी पूर्व परवानगी देण्याचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांना होते. तथापि, महसूल व वन विभागाने दिनांक ०१/०१/२०१६ रोजी निर्गमित केलेल्या सुधारित अधिसूचनेतील तरतुदीनुसार यापुढे मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ कलम ६३ (१)(अ) अंतर्गत खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापराकरीता शेतजमीन खरेदी करण्यासाठी विकास आयुक्त (उद्योग) यांच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नाही, त्यानुषंगाने याविषयी कोणतेही अधिकार उद्योग संचालनालयास नाहीत. खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ शेतकऱ्यांकडून जमीन खरेदी करण्यासाठी परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील कराड उपजिल्हा रुग्णालयाच्या व हेळवाक (ता.पाटण) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिकेसाठी चालक उपलब्ध नसल्याबाबत

**(८) * ७७६६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) येथील उपजिल्हा रुग्णालयात केवळ १०० खाटांची मंजूर क्षमता असताना रुग्णसंख्येचा ताण लक्षात घेता १६४ पेक्षा जास्त खाटा कार्यान्वित करण्यात आलेल्या असून रुग्णवाहिकेसाठी कायमस्वरूपी चालक उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याची व रुग्णवाहिका रुग्णालय परिसरात विनावापर पडून राहिल्याने त्या नादुरुस्त होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कराड प्रमाणेच हेळवाक (ता.पाटण जि.सातारा) या दुर्गम व डोंगरी भागात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या १०२ रुग्णवाहिकेला चालक उपलब्ध नसल्याने रुग्णाला वेळेत उपचार मिळावेत याकरीता आरोग्य निरिक्षकांनाच रुग्णवाहिका चालवाव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कराड (जि.सातारा) येथील रुग्णवाहिका चालविण्याकरीता इतर विभागाचे चालक उपलब्ध करून घ्यावे लागत असून रुग्णवाहिका नसल्याने रुग्णांची प्रचंड गैरसोय होत आहे तसेच १२ चालकांची आवश्यकता असतानाही केवळ आठच पदे मंजूर आहेत व राष्ट्रीय आरोग्य अभियानातून चालक घेण्यासाठी जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव व वारंवार जाहिरात देऊनही चालक उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कराड (जि.सातारा) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णवाहिकांकरीता व हेळवाक (ता.पाटण, जि.सातारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिकांकरीता चालकांची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १३/०५/२००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार उपजिल्हा रूग्णालय ता.कराड जि.सातारा येथे रुग्णवाहिका चालकांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार उपजिल्हा रूग्णालयातील १०२ व १०८ रूग्णवाहिकांकरीता दोन चालक जिल्हा शल्यचिकित्सक, सातारा यांच्याकडून उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे सद्य:स्थितीत दोन्ही रूग्णवाहिका कार्यरत आहेत.

(२) हे अंशत खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र हेळवांक, ता.पाटण येथील १०२ व १०८ रुग्णवाहिका करीता प्रत्येकी एक कंत्राटी वाहन चालक पुरवठादाराकडून उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तथापि, सदर दोन्ही वाहनचालक गैरहजर असता, अत्यावश्यक प्रसंगी (अपघात व प्रसुती) रूग्णास अत्यावश्यक सेवा उपलब्ध व्हावी, याकरीता आरोग्य सहायक यांच्याकडून रूग्णवाहिका चालविण्यात आली होती.

(३) व (४) सातारा जिल्ह्यामध्ये ११ रूग्णवाहिका चालकांची पदे रिक्त असून त्यापैकी १०२ रूग्णवाहिका चालकांची ८ पदे भरण्यास प्रकल्प संचालक, महाराष्ट्र अत्यावश्यक औषधी सेवा,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्यामार्फत मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर रूग्णवाहिका चालकांची रिक्त पदे बाह्यस्त्रोताद्वारे भरण्याकरीता जिल्हा परिषदेमार्फत जाहिरात देण्यात आली होती. त्यामधून ८ रूग्णवाहिका वाहनचालक उपलब्ध झालेले आहेत.

सद्य:स्थितीत उपजिल्हा रूग्णालय ता.कराड, जि.सातारा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र हेळवांक, ता.पाटण जि.सातारा येथे कार्यरत असणाऱ्या रूग्णवाहिकांकरीता रूग्णवाहिका चालक उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जामगाव (आ.) (ता.बार्शी, जि.सोलापूर) येथील गर्भलिंग निदान केंद्रावर कारवाई करण्याबाबत

**(९) * ७८३३ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामगाव (आ.) (ता.बार्शी,जि.सोलापूर) येथील शिवारात एका आलिशान कारमध्ये फिरते गर्भलिंग निदान केंद्र व बेकायदेशीर गर्भपात केंद्र सुरु असल्याची व सदर कारवर छापा टाकला असता त्यात ३ लाख रुपयांची ‘झोन केअर’ चालू स्थितीतील पोर्टेबल सोनोग्राफी मशीन व प्रोब आढळून आल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदर प्रकरणी बेकायदेशीर गर्भलिंग निदान केंद्र चालविणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) जामगाव येथील घटनेची चौकशी करून PCPNDT कायदयाअंतर्गत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय बार्शी यांचे न्यायालयात Cri.M.A.४६/२०२६ अन्वये समुचित प्राधिकारी यांचे मार्फत केस दाखल करण्यात आलेली आहे.

तसेच एमटीपी कायदयाच्या उल्लंघनाबाबत बार्शी पोलीस ठाणे मध्ये गु.र.नं.०८/२६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून त्यामध्ये आठ आरोपीना अटक करण्यात आलेली असून एक आरोपीचा तपास पोलीस यंत्रणेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हा रुग्णालयातील औषध खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(१०) * ७८६० श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा रुग्णालयात सन २०२४-२५ या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत औषध खरेदी निविदा प्रक्रियेत ४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिक मान्यतेसाठी दिलेले निविदा क्रमांक (उदा. GeM/२०२४/B/२६८७८३२) आणि प्रत्यक्ष पुरवठा आदेशातील निविदा क्रमांक (उदा. GeM/२०२५/B/५७१७२०१) यात तफावत असून सदर निविदेस प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वीच प्रक्रिया राबविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन अधिकाऱ्यांनी फाईलवर आक्षेप नोंदविलेले असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून, नियमबाह्य पध्दतीने एकाच कंपनीकडून बहुतांश औषधांची खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन त्यामध्ये दोषी आढळलेल्या अधिकारी व संबंधित पुरवठादार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## अकोला जिल्ह्यातील प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत नियमबाह्यपणे कंत्राटदारांना कामाचे वाटप करुन अनियमितता केल्याबाबत

**(११) * ७९६५ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मृद व जलसंधारण विभागाने अकोला जिल्ह्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कंपोझिट गॅम्बियन बंधारे बांधण्याच्या काम वाटपामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ४३ कामांच्या निविदा राज्य शासनाच्या ई-निविदा पोर्टलवर आणि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द न करता जिल्ह्यात परिचित नसलेल्या दैनिक व साप्ताहिकामध्ये माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा प्रक्रिया पारदर्शीपणे न राबविता जिल्हा जलसंधारण अधिकारी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, निविदा शाखा, पी.एम.के.एस.वाय. शाखा यांनी संगनमताने एकाच कंत्राटदाराला तीन ते चार कामाचे कार्यारंभ आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या नियमानुसार पारदर्शीपणे निविदा प्रक्रिया न राबविता संगनमताने आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना नियमबाह्य कामाचे वाटप करून अनियमितता केल्या प्रकरणाची चौकशी करून दोषीं अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत अकोला जिल्ह्यात करावयाच्या ४३ कामांची किंमत १० लक्ष पेक्षा कमी असल्याने सदर कामांच्या निविदा ऑफलाइन पध्दतीने वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, अकोला यांना कळविण्यात आले होते. तसेच मृद व जलसंधारण विभाग, अकोला यांच्या कार्यालयाच्या नोटीसबोर्ड वर सुध्दा निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या.
(३) हे खरे नाही.

संपूर्ण निविदा प्रक्रिया ही प्रचलीत शासन निर्णयानुसार व परीपत्रकानूसार पारदर्शीपणे राबविण्यात आलेली आहे.

(४) कार्यवाहीचा प्रश्नच उदभवत नाही.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या विकासनिधीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) * ७९९२ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी दरवर्षी शासनाच्या वित्त आयोगातून स्थानिक गावातील लोकसंख्येच्या प्रमाणात लाखो रुपयांचा निधी ग्रामपंचायतीकरीता मंजूर करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींकडून कोणतीही विकासकामे न करता दरवर्षी हा विकास निधी कागदोपत्री खर्च केल्याचे दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत असून याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या विकासनिधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती सदर प्रकरणी दोषी असलेल्या अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अशा प्रकारच्या तक्रारी, जिल्हा स्तरावर प्राप्त झालेल्या नाहीत तर पंचायत समिती अर्धापुर यांच्याकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(३) अर्धापुर तालुक्यात एकूण ३९ ग्रामपंचायती असून ग्रामपंचायतींना शासनाकडून वित्त आयोग योजनेतुन प्राप्त निधी खर्च करण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचना व परिपत्रकानुसार "आमचा गाव आमचा विकास" १५ वा वित्त आयोगाचे ग्रामपंचायत विकास आराखडे ३९ ग्रामपंचायतींनी तयार करुन, ग्रामसभेची मंजूरी घेवून विकास आराखड्यानुसारच कामे करत आहेत. तथापि, ३९ ग्रामपंचातीपैकी ३८ ठिकाणी गैरव्यवहार झाल्याची तक्रार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर प्राप्त झालेली नाही. शासनाकडून प्राप्त निधी नियमानुसार खर्च करण्यात आलेला आहे.

लोणी (खु.) येथे १५ वा वित्त आयोगाच्या निधीत गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार प्राप्त झालेली आहे. त्याबाबत तालुकास्तरावरुन चौकशी समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली असता सदरील ग्रामपंचायतीमध्ये केलेल्या कामात रक्कम रुपये ३२२८५/- एवढया रक्कमेचा अपहार झाल्याचे सिध्द झालेले आहे. सदरील प्रकरणी दोषी ग्रामपंचायत अधिकारी यांचे विरुध्द निलंबनाची कार्यवाही करुन अपहारीत रक्कम वसुलीची कार्यवाही तसेच सरपंच यांचेकडून अपहारीत रक्कम वसुलीची कार्यवाही करणे व त्यांच्यावर नियमानुसार अपात्रतेची कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील पारगाव प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करुन सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१३) * ८०४८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे (ता.जि.पालघर) येथील पारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी यांच्या माध्यमातून १ कोटी ४३ लाख रुपयांची प्रशासकीय मंजूरी मिळून व माहे डिसेंबर, २०२५ मध्ये सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम पूर्ण होऊनही अद्याप उद्घाटनाअभावी सदर केंद्रातून आरोग्यसेवा सुरु न झाल्याने सफाळे पूर्व भागातील दुर्गम आणि डोंगराळ भागातील खेड्यापाड्यांतील व परिसरातील नागरिकांची आरोग्यसेवाविषयक गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करून तेथे आवश्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्राथमिक आरोग्य केंद्र किती कालावधीत सुरु करण्यात येणार आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, पारगाव (ता.जि.पालघर) येथे बांधकाम करणे या कामाची प्रशासकीय मान्यता दिनांक १३/११/२०२३ रोजी प्राप्त आहे. सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून विद्युतीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

सद्य:स्थितीत सफाळे पूर्व भागातील नागरिकांना पारगाव उपकेंद्रामार्फत नियमित आरोग्य सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(२) पारगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास पदे मंजूर झाल्यानंतर तात्काळ आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल. नवीन इमारतीसाठी आवश्यक असणारी वैद्यकीय व अवैद्यकीय उपकरणे व साहित्य पुरविणेसाठी कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील पात्र महिलांना ‘मुख्यमंत्री माझी लाडकी-बहीण’ योजनेंतर्गत अपात्र केल्याबाबत

**(१४)** * **८१०७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक महिलांची ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेची ई-केवायसी (e-KYC) प्रक्रिया तांत्रिक अडचणींमुळे किंवा माहिती भरताना झालेल्या चुकांमुळे प्रलंबित असल्याने पात्र असूनही अनेक महिलांना या योजनेचे दरमहा मिळणारे १,५०० रुपये मिळणे बंद झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगमनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील सुमारे १७ हजार ९६७ पात्र महिलांची नावे प्रशासनाकडून ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेतून अचानक वगळण्यात आली असल्याचे तसेच प्रशासनाकडून प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन कोणतेही सर्व्हेक्षण न करता सदर गरीब व गरजू महिलांच्या नावापुढे संगणकीय प्रणालीवर ‘शासकीय नोकरी’ असा चुकीचा शेरा नमूद केल्याने त्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ तांत्रिक त्रुटी आणि चुकीच्या सर्व्हेक्षणामुळे पात्र असूनही महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळत नसल्याने राज्यातील विशेषत: संगमनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील महिलांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनेच्या उद्देशही असफल होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे तसेच उक्त त्रुटी सुधारण्यासाठी सर्व संबंधित महिलांचे तातडीने फेरसर्व्हेक्षण करून त्यांना योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण" या योजनेतंर्गत Aadhaar Authentication व्दारे e-KYC प्रकीया दिनांक १८/०९/२०२५ ते दिनांक १८/११/२०२५ या कालावधीत पार पडण्यास शासन निर्णय दिनांक १८/०९/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर पात्र लाभार्थी महिलांना e-KYC प्रक्रिया पूर्ण करण्याची मुदत दिनांक ३१/१२/२०२५ पर्यंत देण्यात आली होती.

सदर योजनेतंर्गत ज्या लाभार्थी महिलांकडून अनावधानाने चुकीचा पर्याय निवडला, अशा लाभार्थी महिलांना पुन्हा एक वेळ सुधारणेची संधी दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंगरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील मँगनीज खाणीतील कामगारांना मूलभूत सोयीसुविधा मिळण्याबाबत

**(१५) * ८३४६ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील गावात मँगनीज खाणीतून ६४ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होत असताना येथील कंत्राटी कामगारांनी केंद्र शासनाचे नियमानुसार वेतन, सुरक्षा साधन व इतर मूलभूत सुविधा मिळत नसल्याने खाण प्रशासन व ठेकेदाराविरुध्द काम बंद आंदोलन केल्यामुळे संप कालावधीत साधारणत: २५० कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना केंद्र शासनाचे नियमानुसार वेतन, सुरक्षा साधन व इतर मूलभूत सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे काय, असल्यास त्याचा तपशिल काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे खरे नाही.

मँगनीज ओर लिमिटेडच्या डोंगरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील खाणीसंदर्भात समुचित शासन हे केंद्र शासन आहे. सदरहू खाणीत कंत्राटी कामगारांचा कोणताही बंद किवा संप झालेला नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील नोंदणीकृत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१६) * ८४२३ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी ३२ पेक्षा जास्त योजना राबविल्या जात असून प्रत्यक्षात या योजनेचा लाभ अनधिकृत संघटना, संस्था, दलाल हे घेत असल्याचे तसेच ते अनेक ठिकाणी

बनावट नोंदणी करून कामगारांकडून पैसे घेऊन त्यांची फसवणूक करीत असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागात बांधकाम कामगारांची नोंदणी (MahaBOCW) केल्यानंतर, त्यांना '९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र' मिळविताना स्थानिक स्तरावर अडचणी येत असून महानगरपालिका, नगरपालिका तसेच ग्रामपंचायतीतून कामगारांना तात्काळ प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच या योजनेचा लाभ मूळ नोंदणीकृत इमारत व इतर बांधकाम कामगारांना मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी एकूण २८ विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये थेट लाभाच्या (DBT) आणि In-Kind स्वरुपाच्या योजनांचा समावेश आहे.

दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०६/०१/२०२६ रोजी "बांधकाम कामगारांसाठी खंडीभर योजना-दलालच लाभार्थी" अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजना आणि बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण व बँक खाती इ.बाबत प्राप्त तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हा स्तरावर दक्षता पथक स्थापन करण्याच्या सूचना मंडळामार्फत दिनांक २५/०६/२०२५ रोजी देण्यात आलेल्या आहेत. त्यास राज्यातील सर्व विभागात दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०६/०१/२०२६ रोजी प्रसिध्द झालेली बातमी चौकशीकरीता संबंधित दक्षता पथकाकडे देण्यात आलेली असून त्यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(२) शासनाच्या दिनांक १३/०८/२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये व नगरविकास विभागाच्या दिनांक ०६/११/२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी प्राधिकृत केलेला अधिकारी, संबंधित नगरपालिकेच्या/नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी तसेच संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांना ज्या बांधकाम व इतर बांधकाम कामगारांचे काम सातत्य नसलेले /अस्थायी/दैनंदिन (Casual) स्वरुपाचे आहे आणि त्यामुळे कामगारांना एकापेक्षा जास्त मालकाकडे काम करावे लागते अशा इमारत व इतर बांधकाम कामगारांना ९० दिवसांचे काम केल्याचे प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने विकसित केलेल्या संगणक प्रणालीद्वारे (IWBMS) ऑनलाईन पध्दतीने तालुका सुविधा केंद्रामार्फत कागदपत्रांची तपासणी करुन इमारत व इतर बांधकाम कामगारांची त्यांनी त्यांच्या सोयीने निवड केलेल्या दिवशी नोंदणी केली जाते. तसेच नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळाकडून DBT पध्दतीने विविध योजनांचे लाभ दिले जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रुबी हॉल क्लिनिक (जि.पुणे) येथील अवैधरित्या किडनी प्रत्यारोपण प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(१७) * ८४३१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक येथे दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी निदर्शनास आलेल्या अवैध किडनी प्रत्यारोपण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी शासनाने १८ जुलै, २०२३ रोजी स्थापन केलेल्या सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखालील दहा सदस्यांच्या चौकशी समितीने चौकशी पूर्ण करून मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीला चौकशी दरम्यान अमित अण्णासाहेब साळुंखे हे किडनी स्वीकारणारे व बनावट पत्नी सारिका गंगाराम सुतार या किडनी दाता असल्याचे निष्पन्न झाले असून व किडनी देण्याबाबत ठरलेली रक्कम न मिळाल्याने सारिका गंगाराम सुतार यांची बहीण कविता कोळी यांनी याविषयी तक्रार केल्याचे निदर्शनास आले असून, सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या अहवालाचा अभ्यास करून कारवाईबाबतचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती सदर प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) चौकशी अहवाल शासनास दिनांक १६/०२/२०२६ रोजी प्राप्त झाला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंदी (रेल्वे) (ता.सेलू, जि.वर्धा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(१८) * ८४४३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा सिंदी (रेल्वे) (ता.सेलू, जि.वर्धा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर शहरातील आणि १० कि.मी. परिसरातील ग्रामीण भागातील हजारो नागरिक आजही उपचारासाठी अवलंबून असून सदर आरोग्य केंद्रात दररोज सरासरी २५० ते ३०० रुग्ण उपचारासाठी येतात, मात्र तेथे गंभीर आजार, साधी शस्त्रक्रिया, अपघात किंवा आपत्कालीन प्रसंगात उपचार करण्यासाठी पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना ४० ते ५० कि.मी. दूर असलेल्या वर्धा किंवा नागपूर येथील रुग्णालयात जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळण्याबाबतचे निवेदन दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंदी (रेल्वे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जावाढ करून येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने सहसंचालक आरोग्य सेवा, मुंबई यांनी सन २०२१ मध्ये अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (आरोग्य ३), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सादर केलेल्या अहवालावर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मौजा सिंदी (रेल्वे) (ता.सेलू, जि.वर्धा) येथील ग्रामीण रुग्णालयाची श्रेणीवाढ करुन सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, सिंदी (रेल्वे) मध्ये वाढती लोकसंख्या आणि उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांचा ओघ पाहता सध्याचे प्राथमिक आरोग्य केंद्र नागरिकांच्या मूलभूत आरोग्य गरजा पूर्ण करण्यास अपुरे पडत आहे,
(२), (३) व (४) प्राथमिक आरोग्य केंद्र, सिंदी (रेल्वे) चे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या दिनांक २७/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला होता.प्रस्ताव तपासणीधीन असताना शासनाने दिनांक २९/०५/२०२५ अन्वये असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, यापूर्वी हाती घेण्यात आलेल्या आरोग्य संस्थांची बांधकामे पूर्ण करुन सदर रुग्ण संस्था आरोग्य सेवांसाठी तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्या. तद्नंतर आवश्यकतेनुसार नवीन बांधकामे हाती घेण्यात यावीत.

तरीही, दिनांक २५/०२/२०२६ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे प्राथमिक आरोग्य केंद्र, सिंदी (रेल्वे) या संस्थेच्या दर्जोन्नती मिळणेबाबत प्राप्त निवेदन तपासून पुढील कार्यवाही शासनस्तरावर प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व रुग्णालयांमध्ये रेबीज प्रतिबंधात्मक लशींचा पुरवठा नियमित करण्याबाबत

**(१९) * ८५११ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये रेबीज प्रतिबंधासाठी आवश्यक असलेली अँटी-रेबीज लस व इम्युनोग्लोब्युलिनचा साठा संपत असल्याने सदर औषधांचा तुटवडा निर्माण झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रेबीज प्रतिबंधक लस व इम्युनोग्लोब्युलिन सर्व शासकीय व महानगरपालिका रुग्णालयांमध्ये उपलब्ध ठेवणे बंधनकारक असताना हा तुटवडा निर्माण होण्यामागील कारणे काय आहेत तसेच राज्यासह मुंबईतील कोणकोणत्या शासकीय/पालिका रुग्णालयांमध्ये आणि किती कालावधीपासून सदर औषधांचा तुटवडा आढळून आला आहे,

(३) असल्यास, सदर लस उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे जाण्याची वेळ येत असल्याने रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याने हा तुटवडा दूर करण्यासाठी शासनाने अतिरिक्त लस व इम्युनोग्लोब्युलिन खरेदी करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याबाबत तसेच भविष्यात अँटी-रेबीज लस व इम्युनोग्लोब्युलिन या औषधांचा तुटवडा होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये खालीलप्रमाणे श्वानदंश लस उपलब्ध आहे :

| Sr. | Name of Medicine | Stock in Hand (CS,DHO) |
|---|---|---|
| १. | Anti Rabies Vaccine ID (Human Tissue culture) ०.५ ml | १५४९५७ |
| २. | Anti Rabies Vaccine IM (Human Tissue culture) ०.५ ml | ६२९६२ |
| ३. | Inj Anti Rabies Serum ३०० IU/ml-ML Vail (ARS) / १५०० IU/ml-५ML IM/SC | ३६२४ |

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रेबीज प्रतिबंधक लस व इम्युनोग्लोब्युलिन सर्व शासकीय व महानगरपालिका रुग्णालयांमध्ये उपलब्ध ठेवणे बंधनकारक आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या आरोग्य संस्थांकरीता केंद्रीय खरेदी पध्दतीने राज्यस्तरावरून खरेदी करून श्वानदंश लसीचा पुरवठा करण्यात येतो.

मुंबई महानगरपालिकेत डिसेंबर, २०२५ मध्ये पुरेसा अँटी रेबीज लससाठा उपलब्ध होता.
(३) रेबीज प्रतिबंधक लस व इम्युनोग्लोब्युलिन ही औषधी शासकीय संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच, गरज पडल्यास जिल्हा स्तरावरून स्थानिक खरेदीचे अधिकार जिल्हास्तरीय आरोग्य संस्थाना देण्यात आलेले आहेत. इतर अतिरिक्त साठा असलेल्या संस्थेंकडून ई-औषधी प्रणालीद्वारे गरज असलेल्या आरोग्य संस्थांकडे सदरील औषधी पाठविण्यात येतात. तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील निर्णयानुसार रुग्णांना कोणतेही औषध बाहेरुन आणण्यासाठी सांगितले जात नसून, स्थानिकस्तरावर संबंधित रुग्णालयाकडून खरेदी करुन उपलब्धता करुन देण्यात येतात.

शासन निर्णय दिनांक १२/०६/२०२५ व दिनांक २९/०८/२०२५ अन्वये राज्यस्तरीय अनुदानातून औषधी व साहित्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेनुसार महाराष्ट्र वैद्यकिय वस्तु खरेदी प्राधिकरणामार्फत निविदा प्रक्रीया राबवून जिल्हास्तरावर औषधी व साहित्य सामुग्रीचे पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामध्ये श्वानदंश, सर्पदंश यासारख्या लसींचा प्राधान्याने समावेश करण्यात आलेला आहे.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रेबीज प्रतिबंधक लस व इम्युनोग्लोब्युलिन सर्व शासकीय व महानगरपालिका रुग्णालयांमध्ये उपलब्ध ठेवणे बंधनकारक असल्याने, जिल्हास्तर/मनपा स्तरावर उपलब्ध असलेल्या स्थानिक अनुदानातून तातडीची व अत्यावश्यक औषधांची खरेदी करण्याचे निर्देश यापूर्वीच देण्यात आल्याने सदर औषधांचा संबंधित रुग्णालयांनी प्रत्यक्ष गरजेनुसार साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई येथील आरोग्य यंत्रणा सुधारण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(२०) * ७०७९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंट जॉर्जेस रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल झालेल्या दर पाच रुग्णांपैकी दोघांचा मृत्यू होत असून मागील तीन वर्षात १२७६ रुग्णांपैकी तब्बल ५२० जणांचा मृत्यू झाल्याने तेथे उपचार घेणाऱ्या जवळपास १३% रुग्ण पूर्ण उपचार न घेताच स्वत:हून डिस्चार्ज घेऊन निघून गेल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक प्रशिक्षणार्थी वैद्यकीय अधिकारी अतिदक्षता विभागामध्ये कर्तव्यावर असल्याने सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांना क्रिटिकल केअरची कुठलीही प्रशिक्षित पात्रता नसताना या प्रशिक्षणार्थीकडून रुग्णांवर उपचार करण्यात येत असल्यामुळे रुग्ण दगावण्याची संख्या वाढत असल्याची बाब माहिती अधिकारात प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेंट जॉर्जेस रुग्णालयातील प्रशिक्षित, अनुभवी वैद्यकीय अधिकारी कर्तव्यावर अनुपस्थित राहत असून काही वैद्यकीय अधिकारी हे त्यांच्या खाजगी रुग्णालयांत किंवा इतर रुग्णालयांत काम करुन दोन वेतन घेत असल्याने सेंट जॉर्जेस रुग्णालयाची आरोग्य यंत्रणा विस्कळीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन, चौकशीअंती आढळलेल्या दोषींवर व प्रशासनावर कारवाई करण्याकरीता व सेंट जॉर्जेस रुग्ण्यालयाची आरोग्य यंत्रणा सुधारण्याकरीता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

तथापि, मे, २०२२ ते जुलै, २०२५ या तीन वर्षांच्या कालावधीत सेंट जॉर्जेस रुग्णालयातील अतिदक्षता विभागात २१५२ रुग्ण दाखल झाले होते. त्यापैकी ५२१ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तसेच अतिदक्षता विभागात उक्त कालावधीत उपचार घेणाऱ्या रुग्णांपैकी फक्त ७.८ टक्केच रुग्ण उपचार पूर्ण न करता डिस्चार्ज (DAMA) घेऊन गेले आहेत.

(२) ही बाब वस्तुस्थितीला धरून नाही. तथापि, अतिदक्षता विभागात सहायक प्राध्यापक (औषधवैद्यकशास्त्र) यांच्या देखरेखीखाली आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक इंटर्न यांची नियुक्ती केलेली असते. त्यांना रुग्णांच्या उपचाराबाबत निर्णय घेण्याची मुभा नसते.
(३) हे खरे नाही. या रूग्णालयात अतिदक्षता विभागात कार्यरत असणारे डॉक्टर हे कर्तव्यावर कायम उपस्थित आहेत तसेच सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई येथील आरोग्य यंत्रणा सुरळीत सुरू आहे. तथापि, रुग्णालयातील रक्तपेढी विभागातील एक डॉक्टर काही कालावधीकरीता इतर रुग्णालयामध्ये काम करित असल्याचे चौकशीत आढळून आले आहे. त्याच्या विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) सेंट जॉर्जेस रुग्णालय येथे आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी व रुग्णालयातील मृत्यूदर कमी करण्याच्या उद्देशाने संस्थास्तरावर समिती गठित करण्यात आली असून या समितीच्या सूचनांनुसार अतिदक्षता विभागात एक अतिरिक्त सहायक प्राध्यापक (भुलतज्ञ) नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, बायोमेडिकल वेस्टचे योग्य सेग्रिगेशन सुरू करण्यात आले आहे, संसर्ग नियंत्रण व देखरेख काटेकोरपणे राबविण्यात येत आहे, मृत्यूंचे स्वतंत्र वर्गीकरण केले जात आहे. दर सहा महिन्यांनी डेथ ऑडिट करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय आरोग्य योजनेत समायोजन करण्याबाबत

**(२१) * ६८४५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रधानमंत्री मातृवंदन योजना सन २००६ पासून कंत्राटी कर्मचाऱ्यांमार्फत राबविण्यात येत असून काही महिन्यांपूर्वी ही योजना अचानकपणे बंद करण्याचा निर्णय महिला व बालविकास विभागाने घेतल्यामुळे सदर योजनेतंर्गत काम करणाऱ्या ४८ कर्मचाऱ्यांचे मागील ६ महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याने त्यांचे कुटुंबिय आर्थिक अडचणीत आले असल्याची बाब दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर योजना बंद करण्याचा निर्णय घेतला असला तरी सद्य:स्थितीत त्यांच्या जागी बाहयस्त्रोतांद्वारे नवीन भरती करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचे अध्यक्षतेखाली बैठक झाली असता प्रधानमंत्री मातृवंदन योजनेतील सदर कर्मचाऱ्यांचा "राष्ट्रीय आरोग्य योजनेत समावेश करण्याचा प्रस्ताव सहसंचालकांनी शासनाकडे पाठवावा" असे आदेश देऊनही त्याबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनाकडे पाठविण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत तसेच सदर कर्मचाऱ्यांच राष्ट्रीय आरोग्य योजनेत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१), (२), (३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियान हे सन २००५ पासून संपूर्ण देशामध्ये सुरु झाले. तर प्रधानमंत्री मातृ वंदना योजना ही सन २०१७ पासून संपूर्ण देशात सुरु करण्यात आली. केंद्र शासनाने योजनेत केलेल्या बदलानुसार सुधारीत प्रधानमंत्री मातृवंदना योजना २.० ही राज्यामध्ये सन २०२३ पासून सुरु आहे. केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाआधारे सदर योजना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०६ सप्टेंबर, २०२४ अन्वये साधन सामुग्री व मनुष्यबळासह राज्याच्या महिला व बालविकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

तथापि, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील कंत्राटी कर्मचारी उक्त आदेशानुसार महिला बालकल्याण विभागात रुजू होणे ऐवजी त्यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांप्रमाणे कायमस्वरुपी समावेशनासाठी मा.उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल केल्या.

सदर याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने महिला व बालविकास विभागास प्रधानमंत्री मातृवंदना योजनेंतर्गत कर्मचारी नियुक्तीच्या अनुषंगाने “जैसे थे (Status quo)” ठेवण्याचे निर्देश दिले होते. सदर निर्देश तसेच कर्मचाऱ्यांकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने विविध स्तरावर झालेल्या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या वेतनाची अडचण विचारात घेऊन माहे एप्रिल, २०२५ ते माहे सप्टेंबर, २०२५ अखेर या कर्मचाऱ्यांना आरोग्य विभागामध्ये मुदत वाढ देवून त्यांच्या सेवा महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करणे असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार योजनेंतर्गत ४८ कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी केवळ ८ कर्मचारी महिला व बालविकास विभागाकडे रुजु झाले.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६/१२/२०२५ अन्वये या कर्मचाऱ्यांचे निवेदन विचारात घेऊन नियमातील तरतुदीनुसार चार महिन्यात निर्णय घेण्याचे आदेश पारित करुन याचिका निकाली काढल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाचे न्याय निर्देश विचारात घेवून या प्रकरणी पुढील कार्यवाही सरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे येसगांव ते ममुराबाद जानेफळ या परिसरातील धांड नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(२२)** * **६७४७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येसगांव ते ममुराबाद जानेफळ या परिसरात (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) वाहणाऱ्या धांड नदीचे पात्र रुंदीने मोठे असून अतिवृष्टीमुळे नदीवरील पुल वाहून गेल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धांड नदीवरील पुलाअभावी स्थानिक नागरिकांना आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे, तरी प्रशासनाने पाहणी करुन स्थानिकांना मदत होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, सदर गावाला दुसरा पर्यायी रस्ता नसल्यामुळे तातडीने पुलाचे बांधकाम करण्याचे काम सुरु करुन पर्यायी रस्ता उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामधील खुलताबाद तालुक्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रा.मा.२१९ ते ममुराबाद रस्त्यावरील सा.क्र.१/५७० येथील पूल क्षतिग्रस्त झाला होता.तथापि, सदर पुलाची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत रा.मा.२१९ ते ममुराबाद रस्त्यावरील साखळी क्र.१/५७० येथे ३० मीटर लांबीच्या पुलास दिनांक ३०/०९/२०२५ रोजी रुपये २३८.०८ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर पुलाच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १२/०१/२०२६ रोजी देण्यात आला असून काम सुरु झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रुईखेडा (जि.जळगाव) येथील लघु पाटबंधारे योजनेच्या सांडव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(२३) * ७९७९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे रुईखेडा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील गट नं. ३७३/१ व ३७३/२ ही जमीन दिनांक १६ जानेवारी, १९९८ रोजी जलसंधारण विभागाने धरणाच्या सांडव्यासाठी संपादित केली असून, सदर जमीन संपादित करून २७ वर्षे घेऊनही संबंधित बाधित शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत जमिनीचा मोबदला मिळालेला नसल्याने याबाबत येथील लोकप्रतिनिधींनी सचिव, जलसंधारण विभाग यांच्याकडे दिनांक १३ जुलै, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्रव्यवहाराची दखल घेऊन बाधित शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा मोबदला तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) लघु पाटबंधारे योजना रुईखेडा, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव या योजनेच्या सांडव्यासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा एकूण मावेजा रुपये ६,९४,७०६/- पैकी रुपये १,५७,४६५/-इतका मावेजा संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेला आहे. उर्वरित रुपये ५,३७,२४१/-इतका मावेजा संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांचे थकित मानधन अदा करण्याबाबत

**(२४) * ८२१४ डॉ.परिणय फुके, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालयात कार्यरत निवासी डॉक्टरांना मागील तीन महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने महाविद्यालयात कामबंद आंदोलन सुरू केल्यामुळे सदर दंत महाविद्यालयातील दंत शस्त्रक्रिया, बाह्यरुग्ण सेवा, इतर वैद्यकीय सेवा व शैक्षणिक व्यवस्था विस्कळीत होऊन विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणावर तसेच नागरिकांच्या आरोग्यसेवांवर परिणाम होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवासी डॉक्टरांचे मानधन नियमितपणे देण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभाग, संबंधित महाविद्यालय प्रशासन व संलग्न यंत्रणांकडून आवश्यक आर्थिक नियोजन व नियंत्रण यंत्रणा प्रभावीपणे राबविण्यात आलेली नसल्यामुळे सदर परिस्थिती उद्भवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांचे मानधनाची थकबाकी देण्याकरीता तसेच भविष्यात अशा प्रकारे मानधन थकीत ठेवण्यात येऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे पदव्यूत्तर डॉक्टर यांच्या दिनांक १२/०१/२०२६ ते १७/०१/२०२६ रोजीपर्यंतच्या संप कालावधीमध्ये दंत शस्त्र क्रिया, बाह्यरुग्ण सेवा, इतर वैद्यकीय सेवा नियमित डॉक्टर यांच्या मार्फत पार पडल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणावर तसेच नागरीकांच्या आरोग्य सेवावर कोणताही परिणाम झालेला नाही.
(२) व (३) सदर थकीत विद्यावेतन दिनांक १९/०१/२०२६ रोजी अदा करण्यात आले आहे. उर्वरित कालावधीसाठी विद्यावेतन थकीत राहू नये यानुषंगाने शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर करीता माहे फेब्रुवारी, २०२६ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे आवश्यक तेवढी तरतूद मंजूर करुन घेण्यात आली आहे. तसेच विभागामार्फत दिनांक ०३/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये विहित कालमर्यादेत निधी वितरित करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून त्याबाबत आयुक्त व संचालक वैद्यकीय शिक्षण यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत

**(२५) * ७७६८ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा विभागात गेल्या १० ते १२ वर्षापासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दीर्घकाळ सेवा बजावुनही त्यांना भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य योजना, बोनस, विमा संरक्षण, सामाजिक सुरक्षा योजना तसेच अधिकृत ओळखपत्रही देण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित ठेकेदाराकडून कर्मचाऱ्यांना थेट कामावरुन काढून टाकण्याच्या धमक्या देण्यात येत असल्याचे व याबाबत ठेकेदारांकडे विचारणा केली असता गेल्या सहा ते आठ महिन्यांपासून शासनाकडून त्यांची देयके अदा करण्यात आलेली नसल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतन देणे शक्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीअंती दोषींवर कारवाई करण्याकरीता तसेच कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य योजना, बोनस, विमा संरक्षण, सामाजिक सुरक्षा योजना अधिकृत ओळखपत्रही व त्यांना वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा विभागामार्फत सातारा, पांचगणी व महाबळेश्वर या शहरांना पाणीपुरवठा करण्यात येतो. सदर पाणीपुरवठा योजना चालविण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविण्याकरीता निविदा प्रसिध्द करुन बाह्ययंत्रणेची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर योजनेवर कार्यरत असलेल्या मनुष्यबळासाठी बाह्ययंत्रणेला भविष्य निर्वाह निधी, विमा संरक्षण इत्यादी लाभांसह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मानधनाची देयके अदा करण्यात येतात.
(२) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणातील पाणीपुरवठा योजनेवर कार्यरत मनुष्यबळास संबंधित बाह्ययंत्रणेकडून कामावरुन काढून टाकण्याच्या धमक्या दिल्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.

तसेच, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून नेमलेल्या ६ बाह्ययंत्रणांपैकी ५ बाह्ययंत्रणांची मनुष्यबळाच्या मानधनाची देयके (दोघांचे ऑगस्ट, २०२५ पासून, एकाचे सप्टेंबर, २०२५ पासून व दोघांचे डिसेंबर, २०२५ पासून) प्रलंबित आहेत. परंतु, सदर मनुष्यबळाचे मानधन थकित नसून, संबंधित बाह्ययंत्रणांमार्फत माहे जानेवारी, २०२६ पर्यंतचे मानधन मनुष्यबळास अदा केलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांगरपहाड (ता.किनवड, जि.नांदेड) गावातील अंगणवाडी सेविकेच्या कामकाजाची चौकशी करणेबाबत

**(२६) * ७९९९ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट तालुक्यातील (जि.नांदेड) अतिदुर्गम भागातील पांगरपहाड गावातील अंगणवाडी केंद्रातील सेविकेच्या मनमानी कामकाजामुळे गावातील महिला बालकांना विविध योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अंगणवाडी सेविका नियमित अंगणवाडीत येत नसून गावातील आठवडी केंद्र सतत बंद ठेवण्यात येत असल्यामुळे लहान मुलांचे शैक्षणिक आणि पोषण विषयक नुकसान होत असल्याने ग्रामस्थांनी सदर अंगणवाडी सेविकेच्या मनमानी कामकाजाविरोधात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, नांदेड यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये लेखी तक्रार दाखल केली असून संबंधित अंगणवाडी सेविकेवर तात्काळ निलंबनाची कारवाई न केल्यास निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशाराही दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन दोषी असलेल्या अंगणवाडी सेविकेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) मौजे पांगरपहाड ता.किनवट, जि.नांदेड येथील नागरिकांनी अंगणवाडी सेविका यांच्या कामकाजाबाबत माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये बालविकास प्रकल्प अधिकारी, किनवट यांचेकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता अंगणवाडी सेविका ह्या अंगणवाडी केंद्रात नियमित हजर राहत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे अंगणवाडी केंद्रातील पुर्व प्राथमिक शिक्षण देणे या एका सेवेवर काही अंशी परिणाम झाला आहे. तथापि, संबंधित अंगणवाडी केंद्रातील मदतनीस यांचेमार्फत लाभार्थ्यांना गरम ताजा आहार, घरपोच आहार, इत्यादी सेवा पुरविण्यात आलेल्या आहेत. याबाबत पोषण ट्रॅकर वरील Face Recognition System वर (Real Time Monitoring फोटोसह) नोंदी उपलब्ध असून याबाबत खात्री करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक १२/०४/२००७ मधील तरतुदीनुसार सदर सेविकेस कामकाजात सुधारणेकरीता एकवेळ संधी देण्यात आली आहे. याशिवाय संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच तसेच इतर ग्रामस्थ यांनीदेखील सदर अंगणवाडी सेविका यांची आतापर्यंतची सेवा लक्षात घेता त्यांना एकवेळ संधी देण्याची लेखी विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मिशन शक्ती अंतर्गत पाळणा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(२७)** * **८११० श्री.सत्यजीत तांबे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र शासनाच्या मिशन शक्ती अंतर्गत ३४५ ठिकाणी नोकरदार महिलांच्या बालकांसाठी ‘पाळणा’ ही योजना माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येऊन १३ महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्याप सदर योजना कार्यान्वित झाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना असतानाही केवळ आर्थिक तरतूद, साहित्य खरेदी, कर्मचाऱ्यांचे मानधन आणि शासकीय नियोजनाचा अभाव यांसारख्या कारणांमुळे ह्या योजनेची अंमलबजावणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यासह राज्यात अद्याप पाळणाघरांची उभारणी न झाल्यामुळे नोकरदार मातांच्या ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुलांच्या संगोपनासाठी सुरक्षित व दर्जेदार सुविधा उपलब्ध होत नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून पाळणा (Anganwadi cum creche) योजना विनाविलंब सुरू करण्याकरीता तसेच पाळणा सेविका व मदतनीस यांच्या ५ हजार ५०० व ३ हजार रुपये या अल्प मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२), (३) व (४) मिशन शक्ती अंतर्गत पाळणा (Anganwadi cum creche) ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात सूरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याअंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार राज्यात ३४५ पाळणा (Anganwadi cum creche) सूरू करण्यास मान्यता देण्यात आली. त्यापैकी सद्य:स्थितीत ५२ पाळणा (Anganwadi cum creche) कार्यान्वित करण्यात आले असून उर्वरित कार्यान्वित करण्यात येत आहेत. सदर योजनेमधील पाळणा सेविका व पाळणा मदतनीस यांचे मानधन केंद्र शासनाने निश्चित केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील कर्करोग विभागातील कोबाल्ट यंत्रणेकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२८) * ८३५३ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुण्यालयातील कर्करोग विभागातील कोबाल्ट यंत्रणाचा सोर्स अल्पावधीत संपुष्टात येणार असून नागपूरात मोठ्या प्रमाणात कर्करोगाचे रुग्ण असल्यामुळे त्यांच्यावर उपचार करण्यासाठी जूना सोर्स नष्ट करुन नवीन सोर्स टाकण्यासाठी रूपये १.७५ कोटींचा खर्च अपेक्षित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी दखल घेऊन नागपूर येथील कर्करोगाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी जूना सोर्स नष्ट करून नवीन सोर्स तयार करण्यासाठी लागणाऱ्या रुपये १.७५ कोटी खर्चास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे कर्करोग विभागाकरीता कोबाल्ट-६० सोर्स यंत्रणा खरेदीसाठी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात राज्य योजनांतर्गत रुपये १.४८ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता शासनास प्राप्त आहे.
(२) सदर प्राप्त प्रस्तावाची तपासणी करुन प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासन विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# राज्यातील ग्रामपंचायतींसाठी खरेदी करण्यात आलेल्या कचराकुंडी निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२९) * ८४३३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्रालयाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी सर्व जिल्हा परिषदांना पत्र पाठवून त्यात केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, गावातील सार्वजनिक ठिकाण, शासकीय कार्यालये, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बाजारपेठा तसेच इतर सार्वजनिक जागांवर निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरणासह साठवण करण्यासाठी सार्वजनिक स्तरावर कचराकुंड्या असणे बंधनकारक केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुतांश ग्रामपंचायतीने किमान ५० हजार रुपयांच्या कचराकुंड्या खरेदी केल्या असून या खरेदी प्रक्रियेत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी निविदा पुरवठादार आधीच निश्चित करुन एकूण १०० ते १५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कोणतीही खरेदी प्रक्रिया राबविताना स्थानिक उत्पादनांना प्राधान्य द्यावे, असे शासनाचे धोरण असताना राज्यातील ग्रामपंचायतींसाठी एकाच कंपनीकडून पुरवठा करणे ही बाब त्या धोरणाच्या विपरित असतानाही मंत्रालयीन प्रशासनाने सदर खरेदी केली असून ही खरेदी दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत होणे अपेक्षित असताना अजूनही अनेक ग्रामपंचायतींना या कचराकुड्यांचा पुरवठा झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व ग्रामपंचायतीना कचराकुंड्या मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या अहवालानुसार, हे खरे नाही.

दिनांक २ डिसेंबर, २०२१ च्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक कचराकुंड्यांची खरेदी ही जेम पोर्टलद्वारे करावयाची असून त्यासाठी ग्रामपंचायतस्तरावरील १५ वा वित्त आयोगाचा निधी अनुज्ञेय आहे.

अभियानाचा तीन वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी उलटूनही ग्रामपंचायतींनी सार्वजनिक कचराकुंड्या उपलब्ध करुन घेतल्या नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावरील खरेदी प्रक्रिया सुलभ व्हावी याकरीता राज्य पाणी व स्वच्छता मिशन स्तरावरुन जेम पोर्टलद्वारे निविदा प्रक्रिया राबवून केवळ दर करार करुन ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देण्यात आला होता.हा केवळ दर करार असल्याने ग्रामपंचायती त्यांच्या आवश्यकता व उपलब्ध निधीनुसार निश्चित केलेल्या ०३ पुरवठादारांकडून खरेदी करु शकतात. सदर खरेदीबाबत ग्रामपंचायतींवर कोणतेही बंधन नसल्याने ग्रामपंचायतींना खुल्या बाजारातून सुद्धा सार्वजनिक कचराकुंड्यांची खरेदी करण्याचा पर्याय उपलब्ध होता.

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील उपलब्ध माहितीनुसार, सद्य:स्थितीत राज्यात एकूण ५६,६२९ इतक्या सार्वजनिक कचराकुंड्यां उपलब्ध आहेत. सदर ५६,६२९ सार्वजनिक कचराकुंड्यांपैकी, ग्रामपंचायतींनी राज्यस्तरावरून दर करार केलेल्या ०३ पुरवठादारांकडून केवळ ४,९३४ इतक्याच सार्वजनिक कचराकुंड्या उपलब्ध करून घेतल्या असून त्यांची एकूण रक्कम रुपये ३७९.२२ लक्ष इतकी आहे.

सद्य:स्थितीत राज्य पाणी व स्वच्छता मिशन स्तरावरून सार्वजनिक कचराकुंड्यांच्या अनुषंगाने करण्यात आलेला दर करार दिनांक ३०/०९/२०२५ रोजी संपुष्टात आला आहे.

त्यामुळे पाणी व स्वच्छता विभागाच्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी निविदा पुरवठादार आधीच निश्चित करुन एकूण १०० ते १५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रा) च्या अंमलबजावणीस दिनांक १५/०४/२०२५ आणि दिनांक २६/०२/२०२६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१/०३/२०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

दर करारानुसार निश्चित केलेल्या ०३ पुरवठादारांकडे ग्रामपंचायतींनी मागणी केलेल्या सार्वजनिक कचराकुंड्यांपैकी ५०२७ कचराकुंड्यांचा पुरवठा पुरवठादारांनी केलेला नाही. सदर पुरवठा न झालेल्या कचराकुंड्यांसाठी निविदेतील Clause नुसार दंड आकारण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना दिनांक १२/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच सद्य:स्थितीत राज्य पाणी व स्वच्छता मिशन स्तरावरून सार्वजनिक कचराकुंड्यांच्या अनुषंगाने करण्यात आलेला दर करार दिनांक ३०/०९/२०२५ रोजी संपुष्टात आला आहे.

(४) अद्यापही ज्या ग्रामपंचायतींकडे कचराकुंड्या उपलब्ध नाहीत त्या ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्तरावरून सार्वजनिक कचराकुंड्यांची खरेदी १५ वा वित्त आयोगाच्या निधीमधून करणे आवश्यक आहे, त्याबाबत त्यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

सबब कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे घोरपड (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे जल जीवन मिशन योजनेंतर्गत केलेल्या कामांमुळे रस्त्याची दूरवस्था झाल्याबाबत

**(३०) * ८३९६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घोरपड (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली असून, या योजनेकरीता गावातील सर्व पक्के रस्त्याचे खोदकाम करण्यात आले मात्र सदर योजनेचे काम पूर्ण होऊन एक वर्षाचा कालावधी झाला तरीही खोदलेल्या रस्त्याचे अद्यापही काँक्रिटीकरण ठेकेदारांनी केले नसल्याने येथील गावकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी रस्ते दुरूस्तीसंबंधी अनेक सूचना व तक्रारी देऊनही संबंधित कंत्राटदार व प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असून या खराब रस्त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने याची दखल घेऊन संबंधित कंत्राटदारास उपरोक्त रस्ता दुरुस्त करुन देण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन याप्रकरणी दोषी कंत्राटदारावर कारवाई करण्याकरीता तसेच मौजे घोरपड गावातील जल जीवन मिशनच्या कामामुळे रस्त्याची झालेली दुरवस्था दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

या संबंधित मौखीक तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे दिनांक १६/०१/२०२६ रोजी प्राप्त झाली होती. सदर तक्रारीची दखल घेण्यात आलेली असून कंत्राटदाराला दिनांक १९/०१/२०२६ रोजी निर्देश देण्यात आले आहेत.

(३) सदर प्रकरणात संबंधित कंत्राटदाराला काँक्रिटीकरणाचे काम माहे फेब्रुवारी, २०२६ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे जिल्हा परिषद भंडारा यांचेकडून निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत राज्यमार्ग ७६ ते घोणसई रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३१)** * **७७७४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील राज्यमार्ग ७६ ते घोणसई या एक किलोमीटर रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत दोन वर्षांपुर्वी मंजूर झाले असून शासनाने त्यासाठी १ कोटी ६५ लाख ६५ हजार रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची बाब दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सदरचे काम अठरा महिन्यांत पूर्ण होणे बंधनकारक असताना दोन वर्षांचा कालावधी उलटूनही काम अपूर्ण असल्याने नागरिकांना खड्डयांमधून वाट काढत प्रवास करावा लागत असल्यामुळे रस्त्याचे काम तातडीने पूर्ण न केल्यास ग्रामस्थांनी आंदोलन करण्याच्या इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या कामास दोन वर्ष इतका कालावधी होऊनही रस्त्याचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यात दोषी असणाऱ्या अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली तसेच सदरचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२), (३) व (४) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा - II अंतर्गत रामा ७६ ते घोनसई रस्ता सा.क्र. ०/००० ते १/२५० ता.वाडा, जि.पालघर या रस्त्याच्या कामास रुपये १६६.५२ लक्ष इतक्या किंमतीस दिनांक २९/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक २३/११/२०२३ रोजी देण्यात आला.

सदर रस्त्याच्या कामासाठी सा.क्र.०/००० ते १/२५० कि.मी. या लांबीत आवश्यक जागा उपलब्ध होत नसल्याने, तसेच रस्त्याच्या काही लांबीत विद्युत्त वाहिनीचे पोल येत असल्याने काम करताना अडचणी आल्या होत्या. सद्य:स्थितीत, या लांबीतील उपलब्ध जागेनुसार सा.क्र.०/००० ते ०/५०० कि.मी. लांबीत कॉक्रिटीकरणाचे काम पूर्ण केले आहे. तसेच उर्वरीत सा.क्र.०/५०० ते १/२५० कि.मी. लांबीत रूंदीकरणासह खडीकरण (MPM) चे काम पूर्ण केले आहे.

सदर कामावर महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पालघर यांच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत नियमित कामाची पाहणी करून कामाच्या गुणवत्तेची तपासणी केली जाते. सदर काम निविदेतील सर्व अंतर्भुत बाबनिहाय व अटी शर्तीप्रमाणे गुणवत्तापूर्वक मार्च, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवडोंगरा ग्रामपंचायत अंतर्गत कारु (कास) (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील अंगणवाडी मदतनीस पदाच्या भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(३२)** * **७७८६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प हरसुल अंतर्गत सन २०२५-२६ या कालावधीत देवडोंगरा ग्रामपंचायत अंतर्गत कारु (कास) येथील अंगणवाडी केंद्रासाठी अंगणवाडी मदतनीस पदाच्या भरती प्रक्रियेत अनियमितता झाली असून, सदर अनियमितता प्रकरणी दुर्गा पवार रा.कास, देवडोंगरा, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक यांनी बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हरसुल बालविकास प्रकल्प अधिकारी व संबंधित पर्यवेक्षिका यांनी संगनमताने मंगल शिंगाडे यांची कोणतीही सखोल कागदपत्र पडताळणी किंवा शहानिशा न करता त्यांना अंगणवाडी मदतनीस पदी नियुक्ती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नियुक्ती चुकीच्या व अपुऱ्या कागदपत्रांच्या आधारावर करण्यात आल्याने शासनाची दिशाभूल झाली असून या प्रकरणी संबंधित अधिकारी, पर्यवेक्षिका तसेच नियुक्त करण्यात आलेल्या

उमेदवाराची नियुक्ती प्रक्रियेची त्रयस्थ यंत्रणेमार्फत उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे. हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अनियमिततेबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीअंती दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर नियुक्ती रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२), (३) व (४) सदर भरती प्रक्रियेत श्रीमती दुर्गा पवार रा.कास या स्वतः उमेदवार असल्याने आक्षेप कालावधीत त्यांनी लेखी आक्षेप अर्ज प्रकल्प कार्यालयास सादर केलेला होता.परंतु सदर भरती प्रक्रियेमध्ये अनियमितता झालेली आढळून येत नाही. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे नियुक्तीकरीता शासनाने विहित केलेल्या अटी शर्तीनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार या ठिकाणी श्रीमती मंगल शिंगाडे या गुणानुक्रमे व वय जेष्ठतेनुसार प्रथम आल्याने शासन निकषानुसार त्यांना अंगणवाडी मदतनीस पदी नियुक्ती दिलेली आहे. गुणवत्ता यादीनुसार श्रीमती मंगल शिंगाडे यांचा क्रमांक १ तर श्रीमती दुर्गा पवार यांचा क्रमांक ६ होता.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास ग्रामीण (टप्पा-२) अंतर्गत मंजूर घरकुलांची अपूर्णावस्थेतील कामे पूर्ण करण्याबाबत

**(३३) * ८०१२ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा-२) अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये एकूण ४८ हजार ७७१ घरकुलांना मंजुरी मिळाली असताना त्यापैकी केवळ ३२६ घरकुलांची कामे पूर्ण झाली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना हप्त्याची रक्कम वेळेत मिळत नसल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून उर्वरीत घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) नांदेड जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये १,४५,९४१ घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त असून त्याप्रमाणे सर्व लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यापैकी ५७१९ इतकी घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत.
(२) केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) अंतर्गत पर्याप्त निधी प्राप्त असून निधी अभावी घरकुलाची कामे अपुरे राहत असल्याची बाब नाही.

तथापि, केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) अंतर्गत निधी वितरण प्रणालीत SNA ते SNA-SPARSH बदल केल्यामुळे या प्रणालीत सदर योजना परावर्तित करताना निधी वितरणास काही कालावधीसाठी अडथळा येत होता.

परंतु, सद्य:स्थितीत SNA-SPARSH प्रणाली कार्यान्वित असून, यामार्फत निधी लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये वितरीत करण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यातील घरकुलांच्या निधीचा पहिला हप्ता वितरण १३७०७९, दुसरा हप्ता वितरण ६०१४४, तिसरा हप्ता वितरण २५३२३, चौथा हप्ता २४३८ याप्रमाणे लाभार्थ्यांना हप्ते वितरित करण्यात आलेले आहेत

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.